THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 9TH APRIL 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट सुधारण्याबाबदच्या आक्टाच्या मसुद्यावरील, नामदार मुंबईचे गव्हर्नर साहेब बहादुर यांच्या कौन्सिलाच्या सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट आणि सदर्हू सिलेक्ट कमिटीनें सुधारला आहे त्याप्रमाणें तो मसुदा, हे, सदर्हू कौन्सिलाच्या सभांमध्यें काम चालविण्याबाबदच्या कानूंपैकीं २९ व्या कानूअन्वयें सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं खालीं प्रसिद्ध केले आहेतः—**

**सन १८९६ चा आक्टाचा मसुदा नंबर १ ह्मणजे सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा, याचा विचार करण्यासाठीं नेमिलेल्या सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट.**

१ आह्मीं सदरहू मसुद्याचा काळजीपूर्वक विचार केला आहे.

२. त्या मसुद्याच्या ४ थ्या कलमांत खालीं लिहिलेले शब्दसंबंधी फेरफार करावे अशी आमची शिफारस आहेः—

( १ ) [ हा फेरफार मराठींत करणें जरूर नाहीं. ]

( २ ) " दिलेल्या " ह्या शब्दाच्या बदला " पुन्हा दिलेल्या " हे शब्द दाखल करावे.

३. सदरहू मसुद्याच्या ९ व्या कलमाच्या ऐवजीं खालील कलम दाखल करावें अशी आमची आणखी सूचना आहेः—

कलम ३५, रकम (ड), यांत जास्त मजकुर दाखल करणें.

" ९. सदरहू आक्टाच्या ३५ व्या कलमाच्या ( ड ) रकमेंत खालील शब्द जास्त दाखल करावेः—

' आणि त्याचप्रमाणें कलम २६ अन्वयें दिलेल्या दाखल्याच्या डुप्लिकेटबद्दल द्यावयाची फी ठरविण्याबाबद'. "

आम्हास असें वाटतें कीं, सदरहू मसुद्याच्या ९ व्या कलमाअन्वयें आक्टाच्या २६ व्या कलमांत जी सुधारणा करण्याचें योजिलें आहे, ती सुधारणा, सदरीं सुचविल्याप्रमाणें, त्या आक्टाच्या ३५ व्या कलमांत केली असतां जास्त युक्त होईल.

४. आनरेबल मि. एन्. एन्. वाडिया ह्यांचें असें मत आहे कीं, आक्टाच्या १० व्या व ११ व्या कलमांमध्यें कांहीं विवक्षित सुधारणा करणें इष्ट आहे. ह्या सूचनांचा विचार करणें हें, कौन्सिलानें आह्मांस जें काम सांगितलें आहे त्यांत येतें असें मानिलें तरी, त्या सूचनांच्या संबंधाचें आमच्यापुढें जें साहित्य आहे तेवढ्यावरून त्या सूचनांबद्दल आम्हांस

कांहींही नक्की ठरवितां येत नाहीं. म्हणून त्या सूचनांचा विचार करण्याबद्दल नामदार मि. वाडिया यांचा सध्या कांहीं आग्रह नाहीं; ते त्यांच्या संबंधानें एक्झिक्यूटीव सरकारास लिहिणार आहेत.

(सही) एच्. वर्डवुड.
( „ ) बेसिल ल्यांग.
( „ ) डब्ल्यू. डब्ल्यू. लॉक्.
( „ ) एच्. ब्याटी.
( „ ) टी. डी. लिटल.
( „ ) नवरोजी एन्. वाडिया.

मुकाम मुंबई, तारीख २८ फेब्रुआरी १८९६.

आनरेबल मि. नवरोजी एन्. वाडिया, सी. आय्. ई. यांचा शेरा.

सोबतच्या रिपोर्टावर मीं सही केली आहे आणि शेवटल्या पारिग्राफांत सुचविल्याप्रमाणें कलमें १० व ११ ह्यांत जे फेरफार करणें जरूर आहे त्यांच्या संबंधानें एक्झिक्यूटिव सरकारास लिहिलें आहे; आणि माझी अशी आशा आहे कीं, सदरहू मसुदा पसार करण्याच्या आधीं त्या सुधारणांचाही विचार करण्यांत येईल.

(सही) नवरोजी एन्. वाडिया.

---

## सन १८९६ चा मसुदा नंबर १.

(सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.)

(तारीख २६ माहे फेब्रुआरी सन १८९६ रोजीं सिलेक्ट कमिटीनें सुधारल्याप्रमाणें.)

ज्या अर्थीं सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट खालीं लिहिलेल्या रीतीनें सुधारणें योग्य आहे, त्या अर्थीं खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

कलम २ यांत जास्त मजकुर दाखल करणें.

१. सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट, ज्यास ह्यापुढें सदरहू आक्ट म्हटलें आहे, त्याच्या २ ऱ्या कलमांत खालील पोट-कलम ज्यास्त दाखल करावें, आणि तें त्यांत नेहमीं होतें असें समजावें: तें पोटकलम येणेंप्रमाणें :—

"(३) आणि सन १८८७ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट ह्या अन्वयें केलेल्या ज्या ज्या कानू व नेमणुका, प्रसिद्ध करण्यांत आलेले जे जे जाहिरनामे आणि देण्यांत आलेले जे जे अधिकार हा आक्ट अमलांत यावयाच्या तारखेस अमलांत असतील त्या त्या कानू व नेमणुका आणि ते ते जाहिरनामे व अधिकार ह्या आक्टाला विरुद्ध नसतील तेथवर, अनुक्रमें ह्या आक्टाअन्वयें केलेल्या आहेत, आणि प्रसिद्ध केले व दिले आहेत असें समजावें.

कलम १२ याची सुधारणा.

२. सदरहू आक्टाच्या १२ व्या कलमांतील (१) पोटकलमांत, "तो बॉयलर मुंबई शहरांत असला तर तो अर्ज पोहोंचल्याच्या तारिखेनंतर चार दिवसांच्या आंत, व तो बॉयलर इतर ठिकाणीं असला तर तो अर्ज पोंचल्याच्या तारिखेनंतर दहा दिवसांच्या आंत" ह्या मजकुराच्या बदला खालील मजकूर दाखल करावा तो येणेंप्रमाणें:—

"तो बॉयलर जर—

(अ) मुंबई शहरांत असला, तर तो अर्ज पोंचल्याच्या तारखेपासून चार दिवसांच्या आंत,

(ब) एडन अगर पेरिम ह्या वसाहतींत असला तर तो अर्ज पोंचल्याच्या तारखेपासून एका महिन्यांच्या आंत, आणि

(क) इतर ठिकाणीं असला, तर तो अर्ज पोंचल्याच्या तारिखेपासून दाहा दिवसांच्या आंत."

३. सदरहू आक्टाच्या १८ व्या कलमांतील (१) पोट-कलमांत,— कलम १८ ह्याची सुधारणा.

(अ) "मुंबई शहरांत कोणत्याही प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटानें" ह्या शब्दांच्या बदला "मुंबईच्या कलेक्टरानें अगर मुंबई शहरच्या कोणत्याही प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटानें" हे शब्द दाखल करावे; आणि

(ब) "अशा माजिस्ट्रेटानें किंवा कलेक्टरानें" ह्या शब्दांच्या बदला "सदरहू शहराच्या अशा कलेक्टरानें अगर माजिस्ट्रेटानें किंवा इतर ठिकाणच्या अशा कलेक्टरानें" हे शब्द दाखल करावे.

४. सदरहू आक्टाच्या २४ व्या कलमाच्या (३) ऱ्या रकमेंत खालील रकम जास्त दाखल करावीः— कलम २४ ह्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

"आणि असा जाहिरनामा प्रसिद्ध झाला ह्मणजे अशा एन्जिनियरचा दाखला रद्द करण्याचा सरकारास अधिकार आहे.

"मात्र असें ठरविलें आहे कीं, अशा एन्जिनियरानें जर आपण निघून गेल्याबद्दल अगर आपला दाखला हजर करण्यामध्यें हयगयी झाल्याबद्दल सरकारची खात्री होईल असा खुलासा केला, तर, सरकारास, कोणत्याही वेळीं, तो दाखला रद्द करण्याबद्दलचा सदरहू प्रकारचा हुकुम परत घेण्याचा आणि सदरहूप्रमाणें रद्द केलेला दाखला त्या एन्जिनियरास परीक्षा घेतल्याशिवाय पुनः देण्याचा अधिकार आहे.

"आणि अशा रीतीनें पुनः दिलेल्या दाखल्याचा अमल, तो दाखला परीक्षा घेऊन दिलेला असल्याप्रमाणेंच चालेल."

५ सदरहू आक्टाच्या ३५ व्या कलमाच्या (ड) रकमेंत खालील मजकूर जास्त दाखल करावा:— कलम ३५ रकम, (ड), ह्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

"आणि त्याचप्रमाणें कलम २६ अन्वयें दिलेल्या दाखल्याच्या डुप्लिकेटबद्दल द्यावयाची फी ठरविण्याबाबद."

आलीजाह नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,
(सही) एम्. एच्. डब्ल्यू. हेवर्ड,
मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदेकानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख १८ माहे मार्च सन १८९६.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २० माहे फेब्रुवारी सन १८९६ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९६ चा आक्ट ४ था.

### सन १८८९ चा हिंदुस्थानचा बंदरांबाबत आक्ट सुधारण्याकरितां आक्ट.

ज्याअर्थीं सन १८८९ चा हिंदुस्थानचा बंदरांबाबत आक्ट सुधारणें इष्ट आहे, त्याअर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सन १८८९ च्या १० व्या आक्टाचें कलम ६, याची सुधारणा.

१. (१) सदरहू आक्टाचें कलम ६, रकम (ओ), ह्यांतला "आणि" हा शब्द गाळून, त्याच कलमाच्या (पी) रकमेनंतर खालील मजकूर जास्त दाखल करावा. तो येणेंप्रमाणें:—

"आणि

(क) अशा कोणत्याही बंदरांतील तारवांच्या अमलदारांचें व खलाशांचें उष्णतेपासून संरक्षण होई असा, अशा कोणत्याही तारवाच्या मालकास अगर मास्तरास—

(१) डेकचे जे भाग अमलदारांच्या व खलाशांच्या राबत्यांत असतील किंवा प्रत्यक्ष त्यांच्या राहण्याच्या जागांवर असतील त्यांवर सूर्याचे किरण न पडूं देण्यासाठीं पडदे व दुहेरी छतें करण्याविषयीं,

(२) अमलदारांच्या व खलाशांच्या राहण्याच्या जागांमध्यें हवा खेळविण्यासाठीं, त्या वेळीं तारवास असलेल्या जंग्यांच्या अगर डेकवरील द्वारांच्या लगत जितके विंडसेल [तारवाच्या अंतर्भागीं हवा पोंचविण्यासाठीं लावतात ते कापडाचे नळ] वापरतां येण्यासारखे असतील तितके विंडसेल उभारण्याविषयीं,

(३) तारवाचें डेक लोखंडाचें केलेलें असून तें लांकडानें मढविलेलें नसल्यास, प्रत्यक्ष अमलदारांच्या व खलाशांच्या राहण्याच्या जागांवर असणारे डेकचे भाग, लांकडी फळ्यांनीं किंवा उष्णतावाहक नसणाऱ्या इतर योग्य पदार्थानें, आच्छादित करण्याविषयीं,

(४) खलाशांच्या वापरांत असलेली राहण्याची जागा आणि भटारखाना [ग्याली] ह्यांच्यामध्यें फक्त लोखंडी पत्र्याचीच पडदी असेल, तेव्हां ती जागा व तो भटारखाना ह्यांच्यामध्यें उष्णतावाहक नसणाऱ्या कोणत्या तरी योग्य पदार्थाची हंगामी पडदी करण्याविषयीं,

फर्मावून बंदोबस्त करण्यासाठीं."

एस्. हार्व्हे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.